सभागृहात दिलेल्या आश्वासनाच्या अनुषंगाने गठीत करण्यात आलेल्या चौकशी समितीस मुदतवाढ देणेबाबत...

महाराष्ट्र शासन

शालेय शिक्षण विभाग

शासन निर्णय क्रमांकः लवेसू-२०२६/प्र.क्र.४१/एस.डी.३/१५८६३८९

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,

मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२

दिनांक: ३० जुलै, २०२६

<u>वाचा</u> :- शासन निर्णय क्र.लवेसू-२०२६/प्र.क्र.४१/एस.डी.३/१५८६३८९, दि.२६.०५.२०२६

<u>प्रस्तावना :</u>

सन २०२६ चे पहिले (अर्थसंकल्पिय) अधिवेशनामध्ये महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये लक्षवेधी सूचना क्र. २६४४ उपस्थित करण्यात आली होती. सदर लक्षवेधी सूचना ही प्रधानमंत्री पोषण शक्ती निर्माण योजनेंतर्गत राज्यातील शाळांमधील विद्यार्थ्यांना मध्यान्ह भोजनामध्ये हिरवा वाटाणा ऐवजी साधा वाटाणा देण्यात येणे यासंबंधीची होती. सदर लक्षवेधी सूचना दि.१७ मार्च, २०२६ रोजीच्या विधानमंडळाच्या कामकाजात दर्शविण्यात आली होती. सदर लक्षवेधी सूचनेवर सभागृहात चर्चा सुरू असताना सदर विषयाची उच्चस्तरीय चौकशी करण्याची मागणी वि.स.स. यांनी सभागृहात केली होती. सदर लक्षवेधी सूचनेच्या अनुषंगाने सभागृहात निवेदन करताना मा.मंत्री, शालेय शिक्षण यांनी सदर प्रकरणाची सचिव स्तरावर चौकशी केली जाईल असे आश्वासन सभागृहात दिले होते. त्यास अनुसरुन संदर्भिय शासन निर्णयान्वये चौकशी समिती गठीत करण्यात आली आहे.

२. प्रधानमंत्री पोषण शक्ती निर्माण योजनेंतर्गत राज्यातील शाळांमधील विद्यार्थ्यांना मध्यान्ह भोजनामध्ये हिरवा वाटाणा ऐवजी साधा वाटाणा देण्यात येणे याबाबत चौकशी करण्यासाठी प्रधान सचिव, शालेय शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांच्या अध्यक्षतेखाली गठीत करण्यात आलेल्या चौकशी समितीची मुदत दि.२६ जुलै, २०२६ रोजी संपुष्ठात आली असल्याने सदर समितीच्या कार्यवाहीस मुदतवाढ देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

<u>शासन निर्णय</u> :-

प्रधानमंत्री पोषण शक्ती निर्माण योजनेंतर्गत राज्यातील शाळांमधील विद्यार्थ्यांना मध्यान्ह भोजनामध्ये हिरवा वाटाणा ऐवजी साधा वाटाणा देण्यात येणे याबाबत तपासणी करुन शिफारशी करण्यासाठी संदर्भाधिन दि.२६ मे, २०२६ रोजीच्या शासन निर्णयान्वये प्रधान सचिव, शालेय शिक्षण विभाग यांच्या अध्यक्षतेखाली गठीत करण्यात आलेल्या चौकशी समितीस दि.२६ जुलै,२०२६ पासून एक महिन्याची मुदतवाढ देण्यात येत आहे.

२. प्रस्तुत शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२६०७३०११०७५६२२४९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

TUSHAR VASANT MAHAJAN

Digitally signed by TUSHAR VASANT MAHAJAN
DN: c=IN, o=Personal, title=9656, 2.5.4.20=19c6c23f510a80926e9b7ee5db235979452f3f9e8918118634069a6cc7a22b9f, postalCode=400089, st=Maharashtra, serialNumber=1a39cef3c157b9ee6a2abe5779acf233682613f7b9c335d6bf4877267695ceca, cn=TUSHAR VASANT MAHAJAN
Date: 2026.07.30 11:09:03 +05'30'

(तुषार महाजन)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१) मा. राज्यपालांचे सचिव, राजभवन, मुंबई
२) मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई
३) मा. उपमुख्यमंत्री (नगर विकास) याचे सचिव, मंत्रालय, मुंबई
४) मा. उपमुख्यमंत्री (राज्य उत्पादन शुल्क व अल्पसंख्याक) याचे सचिव, मंत्रालय, मुंबई
५) मा. मंत्री, शालेय शिक्षण, यांचे विशेष कार्य अधिकारी, मंत्रालय, मुंबई
६) सर्व मा. मंत्री/ मा. राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
७) मा. विरोधी पक्षनेता, विधानसभा/विधानपरिषद, विधानमंडळ, मुंबई
८) सर्व मा. संसद सदस्य/ विधानसभा सदस्य/विधानपरिषद सदस्य
९) मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई
१०) प्रधान सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई
११) आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे
१२) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व)
१३) शिक्षण संचालक (माध्य. व उच्च माध्य.), महाराष्ट्र राज्य, पुणे
१४) शिक्षण संचालक (योजना), महाराष्ट्र राज्य, पुणे
१५) शिक्षण संचालक (प्राथ.), महाराष्ट्र राज्य, पुणे
१६) शिक्षणाधिकारी (प्राथ.), जिल्हा परिषद (सर्व)
१७) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र ½ , मुंबई/नागपूर
१८) जिल्हा कोषागार अधिकारी, पुणे
१९) शालेय शिक्षण व क्रीडा विभाग (अर्थसंकल्प), मंत्रालय, मुंबई
२०) वित्त विभाग (व्यय-५), मंत्रालय, मुंबई
२१) नियोजन विभाग, कार्यासन १४७१, मंत्रालय, मुंबई
२२) निवड नस्ती - एस.डी. ३